# एम् एच् १७

**चंद्रशेखर पुरंदरे**

१७ जुलैला मलेशियन एअरलाईन्सचे एम-एच १७ हे विमान ॲमस्टरडॅम (हॉलंड) येथून कुआलालंपूर (मलेशिया) येथे जायला निघाले. विमानात २८० प्रवासी आणि १५ कर्मचारी होते. बहुतांश प्रवासी हॉलंडचे नागरिक - डच - होते. उरलेल्यात प्रामुख्याने मलेशियन व ऑस्ट्रेलियन होते. हे विमान रशिया-युक्रेनच्या सीमेवर पाडण्यात आले. २९५ निरपराध लोक हकनाक मृत्युमुखी पडले. हे मृत्यू व नातलगांच्या वेदना हा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा.

पण हां हां म्हणता हा मुद्दा बाजूला पडून घटनेचे राजकीयीकरण जागतिक स्तरावर सुरू झाले. लेख लिहिण्याच्या वेळेपर्यंत काय व कसे घडले हे चित्र स्पष्ट नाही त्यामुळे लेखाचा भर विश्लेषणापेक्षा वर्णनावर आहे.

विमान कसे पडले यावर गदारोळ उठला आहे. ज्या भागात ते पडले तो भाग युक्रेन देशात असला तरी एप्रिलपासून तो प्रदेश युक्रेनपासून विभक्त होऊ इच्छितो. युक्रेनमधून फुटून निघण्याच्या मागणीला व नंतरच्या संघर्षाला रशियाचे खतपाणी आहे असा पश्चिमेचा (अमेरिका व युरोपचा) तेव्हापासूनचा दावा आहे. त्यासाठी अर्वाचीन भूराजकीय परिस्थितीचा थोडक्यात आढावा घ्यायला लागेल.

**भूराजकीय परिस्थिती**

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया यांनी जगात आपले प्रभावक्षेत्र वाढवण्याचा प्रयत्न केला. या शक्ती प्रत्यक्ष आमनेसामने युद्धापर्यंत आल्या नाहीत पण आपल्या आदर्शवादाला जवळच्या अनुयायी देशांमध्ये त्यांनी सतत संघर्ष चालू ठेवला. हे शीतयुद्ध १९९१ ला रशियाच्या विघटनाबरोबर संपले. रशियाचे विघटन पचनी न पडलेली पिढी परत रशियन साम्राज्याची स्वप्ने पाहते. उदाहरणार्थ, १९९१ पर्यंत युक्रेन रशियाचा भाग होता. युक्रेनचा एक भाग - क्रायमिया हा प्रांत रशियाने, या मार्चमध्ये रशियात विलीन केला. युक्रेनच्या पूर्व भागात रशियाशी सांस्कृतिक जवळीक असणारी बहुसंख्य जनता आहे. तो भाग रशियाचा सीमेवर आहे. पश्चिम भाग रशियापेक्षा युरोपला जवळचा मानतो व युरोपमध्ये अधिकृतरीत्या सामील होऊ इच्छितो. युक्रेनच्या या कलाला सध्याचे रशियन अध्यक्ष पुतीन यांचा विरोध आहे. जानेवारीपर्यंत युक्रेनचे केंद्रीय सरकार रशियाधार्जिणे होते. ते युरोपकडे वळायला दिरंगाई करत आहे या मुद्द्यावर असंतोष वाढला व अध्यक्ष पदच्युत झाले. नंतरचा मे पर्यंतचा काळ अराजकाचा होता. त्यातच रशियाने १७ मार्चला क्रायमिया गिळंकृत केला व पूर्व युक्रेनच्या फुटीरतावादी गटांना छुपेपणाने सशस्त्र पाठिंबा दिला. रशियन सैन्यही साध्या वेशात या गटांना मार्गदर्शन करत आहे. त्यानंतर मे मध्ये युक्रेनमध्ये युरोपधार्जिणे लोकनियुक्त सरकार आले. त्याने या फुटीरतावाद्यांवर लष्करी कारवाई सुरू केली. या भागातील प्रमुख शहर डोनेट्स्क (Donetsk). हा वेगळा देश आहे - Donetsk People's Republic असे या फुटीर गटाने जाहीर केले. विमान पडले ते या Donetsk शहराजवळ. ज्या क्षेपणास्त्राने विमान पाडले, ती सामग्री रशियाने फुटीरतावाद्यांना पुरवली व ते प्रशिक्षणही दिले असे पश्चिमेचे म्हणणे आहे. तर ही सामग्री रशियाने पूर्वीच युक्रेनला दिलेली होती. ती युक्रेनेनच विमान पाडायला वापरली असे फुटीर गटांचे म्हणणे आहे. युक्रेनने आपण ती वापरलीच नाही असे म्हटले आहे किंवा आपल्या अखत्यारीतील ही सामग्री फुटीरतावाद्यांनी पळवली व विमान पाडायला वापरली असाही युक्रेनचा संशय आहे. आपण ही सामग्री फुटीर गटाला दिली नाही असे रशियाचे म्हणणे आहे.

पश्चिमेने रशियाला दोषी ठरवलेच आहे. ऑस्ट्रेलियाचे व ब्रिटनचे पंतप्रधान यांनी २०-२१ जुलैला तसे जाहीरपणे सांगितले. अमेरिकन अध्यक्ष ओबामा यांनी रशिया व वैयक्तिकरीत्या पुतीन यांना जबाबदार धरले. त्यांचीच री खालच्या अधिकाऱ्यांनी म्हणजे अमेरिकन परराष्ट्रमंत्री, उपाध्यक्ष, संयुक्त राष्ट्रसंघातील प्रतिनिधी वगैरेंनी ओढली.

याला प्रत्युत्तर म्हणून रशियाने संदेह निर्माण करण्यास सुरूवात केली. त्यांच्या माहितीनुसार कॅमेरा असणारा एक अमेरिकन उपग्रह नेमका त्याच वेळी विमानाच्या वरच्या अवकाशात होता. म्हणजे इथे काहीतरी घटना घडणार आहे याची अमेरिकेला माहिती होती. युक्रेनचे एक लष्करी विमानही मलेशियन विमानापासून त्याचवेळी ३ ते ५ मैलावर उडत होते. विमान पडले गुरूवारी. बुधवारी एक युक्रेनियन लष्करी विमान रशियन लष्करी विमानाने पाडल्याची घटना आता पुढे आली आहे. म्हणजे, आजवर छुपा असणारा पाठिंबा आता उघड झाला आहे असा पश्चिमेचा आरोप आहे.

म्हणजे रशिया-अमेरिका हे प्रमुख प्रतिस्पर्धी तर युक्रेनचे सरकार अमेरिका-युरोपला धार्जिणे व फुटीर गट रशियाला धार्जिणे असे चित्र आहे.

अशा वेळी अपघाताच्या ठिकाणी तज्ज्ञ तातडीने रवाना होतात.

अपघाताचे कारण शोधण्यासाठी विमानाचे अपघातग्रस्त तुटलेले भाग व प्रवाशांचे मृतदेह यांची तपासणी आवश्यक असते. त्यावरून दगाफटका कोणत्या अस्त्रांनी झाला याचा अंदाज करता येतो. सगळ्यात महत्त्वाचे उपकरण म्हणजे विमानाची ब्लॅक बॉक्स. तिच्यात उड्डाणापासून प्रवास संपेपर्यंतच्या विमानाच्या सर्व हालचाली, वैमानिकांचे जमिनीवरच्या कंट्रोल टॉवर्सशी होणारे संभाषण, बदललेले मार्ग, हवामान इत्यादी सर्व गोष्टींचे रेकॉर्डिंग असते.

विमान हवेत उंचीवर फुटले व त्याचे तुकडे झाले. हे तुकडे व मृतदेह, विमानातील सामान वगैरे सुमारे २५-२८ चौरस मैल एवढ्या परिसरात विखरून पडले. हा सगळा परिसर ताबडतोब बंदिस्त करणे आवश्यक होते. दोन गाड्यांची टक्कर झाल्यास पोलीस जसा तो परिसर आपल्या ताब्यात घेतात, तोच प्रकार. त्याचबरोबर पुरावे नष्ट होऊ नयेत म्हणूनही खबरदारी घ्यावी लागते. इथे त्यातले काहीच घडले नाही. प्रदेश संघर्षग्रस्त असल्याने युक्रेनियन लष्कर तिथपर्यंत पोचू शकले नाही. या काही चौरस मैल प्रदेशात मलेशियन व डच तज्ज्ञांची, आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची पथके पहिले दोन-तीन दिवस पोहचूच शकली नाहीत. तोपर्यंत मृतदेह तर उघड्यावर पडले होतेच पण त्यांच्या चीजवस्तूंची, सामानाची व इतर पुराव्याची संभाव्य लूटमारही झाली. फक्त फुटीर गटांचे सैनिक तेथे हजर होते.

डच पथकांना मृतदेह लवकरात लवकर ताब्यात हवे होते. २७० प्रवाशांपैकी १५४ डच प्रवासी होते. मृतदेहांची तपासणी करून ते ताब्यात घेण्यासाठी तीन तज्ज्ञ हॉलंडहून युक्रेनला पोचले. त्यांना युक्रेनमधून या Donetsk Republic च्या सीमेपर्यंत युक्रेनियन लष्कराने संरक्षण दिले. तेथून घटनास्थळापर्यंत फुटीर गटाच्या लष्कराने. दरम्यान फुटीर गटाने मृतदेह तेथून हलवण्याचा निर्णय एकतर्फी घेतला व सगळे मृतदेह प्लॅस्टिकच्या काळ्या बॅगांत भरण्यात आले. बसवर सामान चढवताना जशी बॅगांची हेळसांड होते, तशीच या मृतदेहांच्या पिशव्यांची हेळसांड टीव्हीवर जगाला दिसली, त्याने नातलगांच्या यातनेत भरच पडली. हे २-३०० मृतदेह दोन आगगाड्यांत भरण्यात आले. आगगाड्यांचे ते डबे फ्रीजसारखे होते. मृतदेह आणखी खराब होऊ नयेत म्हणून ही शीत वाहतूक. घटनास्थळाहून या आगगाड्या १५ मैल अंतरावरच्या शहरात नेण्यात आल्या. डच तज्ज्ञांचे पथक हा प्रवास मृतदेहांबरोबर करणे अपेक्षित होते. तसे घडले नाही व ते तिघेजण स्वतंत्रपणे गेले.

ब्लॅक बॉक्सच्या हस्तांतरणासाठी मलेशियाने अमेरिका व रशिया दोघांनाही बाजूला ठेवून सरळ फुटीर गटांशी वाटाघाटी केल्या व शेवटी २१ तारखेला या ब्लॅक बॉक्सेस ताब्यात घेतल्या. आता त्याची तपासणी होईल. यावेळी Donetsk Republic च्या स्वयंघोषित पंतप्रधानाने परत एकदा आमचा या घटनेशी संबंध नाही असे स्पष्ट केले. त्यांच्याकडे जी सामग्री आहे त्या सामग्रीने १३,००० फुटांपर्यंतची विमाने पाडता येतात असे त्याने स्पष्ट केले. विमान ३३,००० फुटांवर उडत होते. फुटीर गटांनी आजवर युक्रेनच्या लष्कराची जी विमाने पाडली ती १३,००० फुटांहून कमी उंचीवर उडत होती असेही त्याने सांगितले.

मृतदेह अखेर हॉलंडमध्ये २३ तारखेला आले. त्यांची मृत्यूनंतरची तपासणी तेथे होईल.

**इतर आंतरराष्ट्रीय प्रतिक्रिया**

दरम्यान संयुक्त राष्ट्रसंघाने या घटनेची त्वरित निष्पक्षपाती चौकशी करावी असा ठराव केला. त्या चर्चेतही रशिया विरुद्ध पश्चिम हा देखावा दिसला व आरोप-प्रत्यारोप झाले. गोंधळाच्या वातावरणामुळे अफवांनाही पीक आले. रशियन अध्यक्ष पुतीन यांचे विमान ब्राझीलहून रशियाला त्याच सुमारास आले. लक्ष्य ते विमान होते व हे विमान चुकून पाडले गेले ही एक अफवा. दुसरी अफवा म्हणजे हे विमान युक्रेनियन लष्कराचे 'वाटले' म्हणून पाडले गेले. अशी 'चुकीने' विमाने अमेरिका व रशिया दोघांनीही पाडलेली आहेत. इराणचे एक लष्करी विमान आपल्या लष्करी जहाजाच्या दिशेने खाली येत आहे अशा संशयावरून अमेरिकेने १९८८ साली पाडले होते. नंतर ते प्रवासी विमान होते व उड्डाण करत वर चालले होते असे स्पष्ट झाले. यात २९० लोक ठार झाले. कोरियन एअरलाईनचे प्रवासी विमान वाट चुकून रशियन अवकाशात आले म्हणून रशियाने १९८३ साली ते पाडले होते. त्यातही सर्व प्रवासी ठार झाले होते.

एकूण चित्र पाहता, एका रशियन स्त्रीची प्रतिक्रिया घटनेवर योग्य भाष्य करतात. रशियन स्त्रीच्या मते आम्हाला पश्चिमेचे गुन्हेगार ठरवलेच आहे. आता चौकशा आणि काहीही काथ्याकूट केला तरी हा निष्कर्ष काढला गेलाच आहे. मग या व्यापाचा मतलब तरी काय?

थोडक्यात, राजकारण हा व्यवसाय चालू ठेवण्यासाठी व सत्तेच्या मोहाने रशिया व पश्चिम या दोन्ही बाजू शीतयुद्धाचे दिवस परत आणतील असे दिसते.

*(दरम्यान युरोप व अमेरिकेने रशियावर कडक व्यापारी निर्बंध आणले आहेत. युक्रेनची दोन लष्करी विमाने फुटीरतावाद्यांनी पाडली आहेत आणि युक्रेनच्या पंतप्रधानांनी राजीनामा दिला आहे.)*

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*